

नकाशा

एक चित्र असते

लेखिका: बार्बरा रिंकॉफ

चित्रे: रॉबर्ट गॅल्स्टर

नकाशा

एक चित्र असते

मराठी अनुवादः सुशील मेन्सन




हा एका दडलेल्या खजिन्याचा नकाशा आहे. फार वर्षांपूर्वी सागरी चाचे असे नकाशे बनवत. आपला सोने-जवाहिऱ्यांचा खजिना आपण कुठे पुरला याची ओळख पटावी, म्हणून ते नकाशा बनवत. या खजिन्याच्या नकाशावर दिलेल्या दिशांचे पालन करणे सोपे असते. तुम्ही स्वतःही ते सहज वाचू शकता.



खजिन्याचा नकाशा

प्रमुख बंदरापासून टेकडीवर चालत जा. मोठ्या खडकाकडून डावीकडे वळा आणि सरळ वीस पावलं चाला. पुढे रस्त्याला फाटा फुटतो. तिथून उजवीकडे वळा. दहा पावलं चालल्यावर रस्त्याच्या डाव्या बाजूला एक ओकचे झाड दिसते. झाडाच्या बुंध्यावर जिथे *जे.आर.* ही अक्षरे कोरली आहेत त्या बाजुस झाडाशेजारी चार फूट खोल खोदा.






हा वेगळ्या प्रकारचा नकाशा आहे. हा एका शहराचा नकाशा आहे. बाणाचे टोक उत्तर दिशा कुठे आहे, हे दर्शवते. काळ्या रंगात रंगवलेल्या घराचे तोंड उत्तरेकडे आहे. बाणाचे टोक त्याच दिशेत असल्यामुळे तुम्ही हे सहज ओळखू शकता.

उत्तर दिशेच्या विरुद्ध स्थानावर दक्षिण दिशा आहे. नदीवरील पूल घराच्या दक्षिणेस आहे. नदी पुलाखाली उत्तरेकडून दक्षिणेकडे वाहाते.

या नकाशात एक **चिन्हसूची** आहे. सूचीतून आपल्याला पुढे दिल्याप्रमाणे माहीती मिळते:



शाळा आणि रेल्वेमार्ग शोधा. विमानतळ, ओढा, नदी, पूल आणि दलदल शोधा.



नकाशावर खऱ्या वस्तू लहान आकारात दाखवतात. कारण त्यांचा खरा आकार दाखवण्यास कागद लहान पडतो. या नकाशात दाखवलेला एक इंच म्हणजे प्रत्यक्षात एक मैल जमीन आहे. म्हणून या नकाशाची **मोजपट्टी** एक मैलासाठी एक इंच आहे, असे आपण म्हणतो.

शाळेपासून विमानतळापर्यंत किती इंच होतात, ते मोजा. मग इंचाचे मैलात रुपांतर करा. त्यावरून शाळेपासून विमानतळाचे खरे अंतर तुम्हाला कळेल.

प्रत्येक नकाशाची मोजपट्टी वेगळी असते. एक इंच म्हणजे, 10 मैल, 20 मैल किंवा शेकडो मैलही असू शकतात. अंतराळाच्या नकाशात एक इंच म्हणजे लक्षावधी मैल असू शकतात.





तुम्ही आपल्या आजुबाजूच्या परिसराचा नकाशा काढू शकता. त्यात तुमचे घर, शाळा, तुमचे आवडते दुकान यांना वेगवेगळ्या चिन्हांनी दाखवा. तुम्ही त्यात फायर ब्रिगेड, पोलीस स्टेशन, हॉस्पीटल आणि बगीचा या जागांची भर घालू शकता. जवळपास नदी, पर्वत किंवा ओढा असेल तर तेसुद्धा तुम्ही नकाशावर दाखवू शकता.

चिन्हसूची

तुमचे घर

तुमची शाळा

फायरब्रिगेड


बगीचा


पोलीस ठाणे

हॉस्पीटल

आवडते दुकान

नदी






हा संपूर्ण जगाचा नकाशा आहे.
तुम्ही कुठे आहात ते शोधा.

हा जगातील एका विशिष्ट भागाचा नकाशा आहे.
हा *उत्तर अमेरिका* खंड आहे.
त्यात *अमेरिकेची संयुक्त संस्थाने* शोधा.





हा *अमेरिकेची संयुक्त संस्थाने याचा* नकाशा आहे. तुम्ही कोणत्या राज्यात राहाता ते शोधा.




हा *कॅन्सस* राज्याचा नकाशा आहे.
त्यात *विचिटा* हे शहर शोधा.


हा विचिटाच्या एका भागाचा नकाशा आहे. यात *इस्टेले स्ट्रीट* शोधा.

तुम्ही राहाता तेथील रस्ता तुमच्या शहराच्या नकाशात तुम्हाला सापडेल.


नकाशे अनेक प्रकारचे असतात – जगाचे, खंडांचे, देशांचे, राज्यांचे, शहरांचे, गावांचे, गल्ल्यांचे, परिसराचे.

इतरही अनेक प्रकारचे नकाशे असतात.





हा रस्त्यांचा नकाशा आहे. एक ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी याचा उपयोग होतो. यात विचिटाहून टोपेकाला जाण्याचा रस्ता शोधा. तुम्ही *एम्पोरिया*जवळून जाल. विचिटा ते टोपेका प्रवासात तुम्ही किती मैल अंतर कापले, हे मोजपट्टी वापरून शोधा.



मॅसेच्युसेट्स उपसागर

हा विमानमार्गाचा नकाशा आहे. विमाने आकाशात कोणत्या मार्गावरून प्रवास करतात, हे तुम्ही यात बघू शकता. तुम्ही जमिनीवर एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्यासाठी जसे रस्त्यांचा वापर करता तसेच वैमानिक आकाशात या मार्गांचा उपयोग करतात..

उतरण्याचे क्षेत्र ⊖ 1200 फूट

अडथळे ^

रेडियो पल्ला


नियंत्रण क्षेत्र

तुमच्या शहरातील पाण्याच्या पाइपांचाही नकाशा असतो. पाइप तुटला, फुटला तर दुरुस्त करणारा कारागीर नकाशा बघतो. पाइप शोधण्यासाटी रस्ता कुठे खोदायचा, हे त्यातून त्याला कळते.



पुढल्या पानावर एक कृषी नकाशा आहे. चिन्हसूचीकडे पाहून तुम्ही ओळखू शकता की मका कुठे उगवला आहे, कापसाचे उत्पादन कुठे घेतले आहे, झाडे-जंगले कुठे आहेत आणि भुईमुगाची लागवड कुठे केली आहे.



मका
कापूस
भुईमूग
जंगल
1
27
1
1



हा समुद्राचा नकाशा आहे. पाणी किती खोल आहे, ते या नकाशावरून कळते. पाण्याखाली पर्वत आणि दऱ्या कुठे आहेत, ते या नकाशात दिसते. पाणबुडे समुद्रात जातात तेव्हा या नकाशाची मदत घेतात.

महासागराची खोली फुटांमध्ये.

हा आभाळातील ताऱ्यांचा नकाशा आहे. या नकाशाच्या मदतीने तुम्ही तारे आणि नक्षत्रे शोधू शकता. अंतराळवीर ताऱ्यांच्या नकाशाची मदत घेतात.



पेट्रोल पंपावर तुम्हाला आपल्या राज्यातील रस्त्यांचा नकाशा दिसतो. त्यात तुम्ही कुठे आहात, ते शोधा. पुढचा प्रवास कोणत्या मार्गावरून करायचा, ते नकाशात बघा. आता तुम्ही नकाशाचे वाचन करत आहात.

